PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Rangi Berangi
Year:

Song: Hiravya Shivari Dolati
Lyricist:

हिरव्या शिवारी डोलती
पिवळी पिवळी कनसं
हिरव्या शिवारी डोलती
पिवळी पिवळी कनसं
जिवाभावाचं गाव हे माझं
जिवाभावाचं गाव हे माझं
आन् हिथली मानसं
आन् हिथली मानसं
चल रं राजा माझ्या सर्जा
चल रं राजा माझ्या सर्जा
हे सर्जा

ही काळी तांबडी धरती
ही काळी तांबडी धरती
निळं आभाळ माथ्यावरती
उठं उन्हाची हळद पिवळी
उठं सावली उजळ ढवळी
गुलाबी वारा पुरवी
अंजिरी पदराची हौस
गुलाबी वारा पुरवी
अंजिरी पदराची हौस
जिवा भावाचं गाव हे माझं
जिवा भावाचं गाव हे माझं
आन् हिथली मानसं

हो हिथली मानसं
चल रं राजा माझ्या सर्जा
चल रं राजा माझ्या सर्जा

शेत डुलतंय
प्रेमानं हसतंय
त्याला जीवन आमचं कळतंय
कुणी मोटेवरी घेई तान
दूर गाई कोणी सुंबरान
कुनी मोटेवरी घेई तान
दूर गाई कुनी सुंबरान
नदीच्या काठी मंजुळ पावा
वाजवीत कोनी बसं
नदीच्या काठी मंजुळ पावा
वाजवीत कोनी बसं
जिवा भावाचं गाव हे माझं
जिवा भावाचं गाव हे माझं
आन् हिथली मानसं
ही आपली मानसं
चल रं राजा माझ्या सर्जा
हे चल की बिगी बिगी राजा
आरं माझ्या सर्जा
हुररर...
चल रे राजा माझ्या सर्जा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*